कर्मचारी भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत नुकसान भरपाई मिळण्यासाठी राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे दाखल तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग
शासन परिपत्रक क्र. आयसीई-०६१९/प्र.क्र.५२/काम-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०६ जून, २०१९

प्रस्तावना :-

मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील अनुराधा इंडस्ट्रीयल इस्टेट, काशिमीरा, मौजे घोडबंदर जि. ठाणे येथे मल:निस्सारण कुंड साफ करताना ३ व्यक्ती मृत झाल्याची तक्रार राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, नवी दिल्ली यांना प्राप्त झाली होती. सदर प्रकरणी आयोगाचे उपनिबंधक (विधी), यांनी क्र.२२९७/१३/३०/२०१३, दिनांक ७/२/२०१८ रोजी समन्स बजावले होते. अशा प्रकारची घटना घडल्यानंतर संबंधित कामगारांच्या वारसांकडून कर्मचारी भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत नुकसान भरपाई मिळण्याबाबतचे दावे आयुक्त, श्रमिक भरपाई यांच्याकडे दाखल होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. यास्तव त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित क्षेत्रिय कार्यालयांना सूचना देण्यासाठी शासन स्तरावरुन परिपत्रक निर्गमित करण्याचे निदेश प्राप्त झाले आहेत. त्यास अनुसरुन या परिपत्रकाद्वारे खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

परिपत्रक :-

१) कर्मचारी भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत नुकसान भरपाई मिळण्यासाठी करण्यात आलेल्या तरतूदींची माहिती नसल्यामुळे व त्याबाबत अनभिज्ञता असल्यामुळे,बहुतांशी प्रकरणी संबंधित कामगारांच्या वारसाकडून त्याबाबतचे दावे / अर्ज आयुक्त, श्रमिक भरपाई यांचेकडे दाखल होत नाहीत. यास्तव सदर अधिनियमातील तरतूदींना व्यापक प्रसिध्दी देण्यांच्या दृष्टीकोनातून कामगार आयुक्त, मुंबई / आयुक्त, श्रमिक भरपाई, मुंबई तसेच अध्यक्ष, औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र, मुंबई यांनी त्यांच्या संकेतस्थळावर सदरची माहिती तात्काळ प्रसिध्द करावी.

२) उपरोक्त अधिनियमातील तरतूदींची संबंधितांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून जनजागृती होण्यासाठी दूरदर्शन, आकाशवाणी, वर्तमानपत्रे व इतर प्रभावी प्रसार माध्यमातून त्यास प्रसिध्दी देण्यात यावी.

३) एखादी घटना घडल्याचे निदर्शनास आल्यानंतर कामगार विभागातील संबंधित क्षेत्रिय कार्यालयातील अधिकाऱ्यांनी सदरहू घटनास्थळी तात्काळ भेट द्यावी व घटनेबाबतची

आवश्यक ती चौकशी करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी व त्याबाबतचा अहवाल तातडीने आयुक्त, श्रमिक भरपाई यांच्या कार्यालयास सादर करावा, जेणेकरुन उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाही करणे शक्य होईल.

४) अशा प्रकारची घटना घडल्यानंतर संबंधित कामगारांच्या वारसांकडून कर्मचारी भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत नुकसान भरपाई मिळण्याबाबतचे दावे / अर्ज आयुक्त, श्रमिक भरपाई यांच्याकडे दाखल होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. यास्तव, अशी घटना निदर्शनास आल्यानंतर कामगार आयुक्त, मुंबई व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयानी तात्काळ संबंधितांशी संपर्क करुन त्यांच्याकडून विहित अर्ज / दावे प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी व वेळोवेळो त्यांना मार्गदर्शन देखील करावे.

५) आयुक्त, श्रमिक भरपाई, मुंबई यांनी कामगार विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून घटने संबंधातील अहवाल प्राप्त झाल्यानंतर उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

६) वर नमूद केल्यानुसार कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ मधील तरतूदींना व्यापक प्रसिध्दी देण्याच्या दृष्टीकोनातून तसेच संबंधितांना आवश्यक ते मार्गदर्शन करण्याबाबत उचित कार्यवाही करण्याच्या सूचना स्थानिक प्राधिकरणांना देण्याची कार्यवाही नगर विकास विभाग व ग्राम विकास विभागाने त्यांचे विभागीय स्तरावर करावी.

७) सदर प्रकरणी कामगार आयुक्त, मुंबई यांनी वेळोवेळी आढावा घ्यावा व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

२. सदरचे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६०६१६१८४२७२१० असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHENDRA KALYANKAR

Digitally signed by MAHENDRA KALYANKAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=63a1e1974ba057de0816c577e58a37332a1706ebf892276aa7494a9a621d5b74, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=INDUSTRY AND ENERGY, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=MAHENDRA KALYANKAR
Date: 2019.06.06 17:07:54 +05'30'

(डॉ.महेंद्र कल्याणकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई ४०० ०३२,
२) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२,
३) मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२,
४) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२,
५) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२,

६) अध्यक्ष, औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र, मुंबई,
७) कामगार आयुक्त, कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, सी- २०, ई ब्लॉक, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व) , मुंबई-४०० ०५१,
८) आयुक्त,श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालय,मुंबई,प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पुर्व) ,मुंबई- ४०० ०५१,
९) सचांलक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, कामगार भवन, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व) , मुंबई-४०० ०५१,
१०) सचांलक, बाष्पके, कामगार भवन, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व) , मुंबई-४०० ०५१
११) सह सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२,
१२) कक्ष अधिकारी (नवि-३४), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१३) कक्ष अधिकारी (समन्वय कक्ष), ग्राम विकास विभाग,बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ, मुंबई-०१,
१४) निवड नस्ती (कामगार-६).